|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

( पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव )

जा.क्र.कबचौउमवि/७-ह/सु.प./४८०७/२०२३ दिनांक:-२३/११/२०२३ २८

**महत्वाचे/कालमर्यादित**

प्रति,

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी**
**संलग्नीत कला व विज्ञान महाविद्यालयांचे मा.प्राचार्य.......**

विषयः- माहे मार्च/एप्रिल, २०२३ मध्ये घेण्यांत आलेल्या परीक्षेत बी.एस्सी. (भूगोल) आणि बी.ए. (इंग्रजी) या अभ्यासक्रमात उत्तीर्ण दिव्यांग विद्यार्थी/विद्यार्थिनींची माहिती पाठविणेबाबत......

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यांत येते की, प्रा.वसंत चिंधू नारखेडे, जळगांव यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठास खालील दोन सुवर्ण पदक प्रायोजीत केलेले आहेत, ते खालीलप्रमाणे:-

१) ***" प्रा.वसंत चिंधू नारखेडे सुवर्ण पदक"*** - बी.एस्सी. (भूगोल) या विषयात विद्यापीठातून सर्वप्रथम येणा-या विद्यार्थ्यास (मुलगा) सुवर्ण पदक प्रदान करणे.

२) ***" सौ.प्रतिभा वसंत नारखेडे सुवर्ण पदक"*** - बी.ए. (इंग्रजी) या विषयात विद्यापीठातून सर्वप्रथम येणा-या विद्यार्थिनीस (मुलगी) सुवर्ण पदक प्रदान करणे.

वरील दोन्ही सुवर्ण पदक प्रदान करतांना दिव्यांग विद्यार्थी व विद्यार्थिनींचा प्राधान्याने विचार करावा, असे त्यांनी सूचित केले आहे.

उपरोक्त अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, विद्यापीठाने माहे **मार्च / एप्रिल, २०२३** मध्ये आयोजीत केलेल्या परीक्षेत बी.एस्सी. (भूगोल) व बी.ए. (इंग्रजी) हा **अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या कालावधीत दिव्यांग विद्यार्थी/विद्यार्थिनी** उत्तीर्ण झालेले आहेत, अशाच विद्यार्थी/ विद्यार्थिनींची माहिती, खाली नमूद केलेल्या तक्त्यात भरुन, **दिनांक ०८.१२.२०२३ पावेतो विद्यापीठास पोहोचेल, अशा बेताने पाठवावी,** जेणेकरुन उपरोक्त प्रायोजीत केलेले सुवर्णपदक प्रदान करतांना दिव्यांग विद्यार्थी/विद्यार्थिनीस प्राध्यान्य देता येईल.

| अ.क्र. | विद्यार्थी/विद्यार्थिनीचे नांव | अभ्यासक्रम | दिव्यांगाची वर्गवारी ☆ | मार्च / एप्रिल २०२३ परीक्षेशी निगडीत माहिती | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | बैठक क्रमांक | पी.आर.एन.क्रमांक |
| १ | २ | ३ | | ४ | ५ |
| | | | | | |

☆ **दिव्यांग विद्यार्थी/विद्यार्थिनींची वर्गवारी शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३०२/विशि-३, दिनांक ०४ मार्च, २०१७ मध्ये नमूद करण्यांत आली असून, सदरचा शासन निर्णय विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

उपरोक्त माहितीसोबत खालील कागदपत्र/दस्तऐवजांच्या **साक्षांकीत प्रती**देखील सादर कराव्यात.

१) प्रथम, व्दितीय व तृतीय वर्षाच्या गुणपत्रकाची (Mark Statement) ची प्रत.

२) मा.जिल्हा शल्य चिकित्सक यांनी संबंधित विद्यार्थी/विद्यार्थिनीस दिव्यांग असल्याबाबत दिलेल्या प्रमाणपत्राची प्रत.

तरी उपरोक्तप्रमाणे विहीत मुदतीत कार्यवाही करावी, विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

**(प्रा. यो.ना. पाटील)**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ